नवीन नियमित दिवाणी दावा क्र.१३९८/२०२५
जुना नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१५
कलावती व इतर वि. दगडू व इतर
CNR NO.MHOS120016722025
नि.क्र. ६१ खाली.

| | |
|---|---|
| MHOS120016722025 | नवीन नियमित दिवाणी दावा क्र.१३९८/२०२५<br>जुना नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१५<br>कलावती व इतर वि. दगडू व इतर<br>CNR NO.MHOS120016722025<br>**नि.क्र. ६४** |

**प्रतिवादी क्र२ ते ४ तर्फे साक्षीदार क्र.२ चा शपथेवर सरतपास**

नावः तुकाराम प्रभु लांडे

वयः ७० वर्षे, व्यवसायः शेती.

रा. तिंत्रज, ता. भुम, जि. धाराशिव.

**प्रतिवादी क्र.२ ते ४ तर्फे साक्षीदार क्र.२ चा पुढील सरतपास त्यांचे विधिज्ञ श्रीमती. ए. बी. खोसे यांचेमार्फत शपथेवर सुरू :–**

०१. मला या दाव्यात न्यायालयाचे साक्षीसमन्स आले आहे. मी या दाव्यातील दत्तात्रय दगडू गायकवाड व विठ्ठल कोंडीबा गायकवाड यांना ओळखतो. त्यांचेमध्ये जो खरेदीचा व्यवहार झाला तो मला माहिती आहे. त्या खरेदीच्या वेळी मी प्रत्यक्ष हजर होतो. ते खरेदीखत दाखविल्यास मी ओळखू शकेन. मला आता ते खरेदीखत दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर मी साक्षीदार म्हणून सही केली आहे. सदरचे खरेदीखत निशाणी ३३ सोबत दाखल केले असून त्यावर विठ्ठल कोंडीबा गायकवाड व संपत विठ्ठल गायकवाड यांचे अंगठे आहेत. सदर खरेदीखतास **निशाणी ६५** देण्यात येते. सदर खरेदीखताचे वेळी मला विठ्ठल कोंडीबा गायकवाड यांनी बोलावले होते.

नवीन नियमित दिवाणी दावा क्र.१३९८/२०२५
जुना नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१५
कलावती व इतर वि. दगडू व इतर
CNR NO.MHOS120016722025
नि.क्र. ६१ खाली.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र.२ ते ४ तर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. आर. व्ही. मोटे यांचेमार्फत शपथेवर सुरू :–**

०२. दगडू व विठ्ठल यांचेमधील नाते मला सांगता येणार नाही. ही जमीन विठ्ठल कडे कशी आली हे ही मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताचे ठरावाची जी बोलणी झाली त्या बोलणीला मी हजर नव्हतो. बोलणी झालेवर दुस–या दिवशी कागद केला. बोलणी झाली त्यावेळी किती पैसे दिले व खरेदीखतावेळी किती पैसे दिले हे मला सांगता येत नाही. खरेदीखतामध्ये पैसे कोठे व किती दिले याबाबत काय लिहिले आहे मला आठवत नाही. साक्षीदार सांगतो की, नऊ हजार रुपये दिले. सदरचे नऊ हजार रुपये दुय्यम निबंधक यांचेसमोर दिले अगर कसे हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला आज दाखविलेला खरेदीखताचा कागद निशाणी ६४ आज रोजी मी पहिल्यांदा पाहिला. साक्षीदार सांगतो की, तो कागद मी खरेदीखतावेळी पाहिला होता व सही केली होती. सदरचा कागद निकाळजे यांनी लिहिला.

०३. या दाव्यात वादी प्रतिवादी कोण व दाव्याचे स्वरुप काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यातील सर्व वादी व सर्व प्रतिवादी यांना मी ओळखत

नवीन नियमित दिवाणी दावा क्र.१३९८/२०२५
जुना नियमित दिवाणी दावा क्र.५८/२०१५
कलावती व इतर वि. दगडू व इतर
CNR NO.MHOS120016722025
नि.क्र. ६१ खाली.

नाही. मला याची माहिती नाही की, दावा जमीन दगडूची वडीलोपार्जित मिळकत आहे. आजपासून निशाणी ६४ वरील खरेदीखताला अंदाजे २५–३० वर्षे झाली असतील. त्यावेळी दत्तात्रयचे वय काय होते हे मला सांगता येत नाही. मला याची माहिती नाही की, निशाणी ६४ च्या खरेदीखतावेळी दत्तात्रय अज्ञान होता. मला हे सांगता येत नाही की, ती जमीन धोंडीबाने विठ्ठलला दिली होती व ती सोडवून परत घेतली होती व तो कागद दत्तात्रयच्या नावे केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व दगडूचे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याचे बाजूने साक्ष दिली.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक – १४/०८/२०२६
ठिकाण– भूम.

श्रवणोत्तर स्वीकृत

PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.08.14 13:35:40 +0530

**(श्रीमती पी.एस.जाधव)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.